जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ५४७ दिनांक - १५/०७/२०२३**

युनिट ०३ गुन्हे शाखा पुणे शहर

## विक्री करण्याकरीता स्वतः जवळ दोन गावठी पिस्टल व ०७ जिवंत काडतुसे बाळगणा-या सराईत गुन्हेगारास युनिट ०३ ने केली अटक

मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर, मा.पोलीस सह आयुक्त व अपर पोलीस आयुक्त,गुन्हे पुणे शहर यांनी पुणे शहरातील गुन्हेगारी नष्ट व्हावी व गुन्हयांना प्रतिबंध व्हावा याकरीता पोलीस अभिलेखावरील सराईत गुन्हेगार,यांना चेक करुन त्यांचे विरुध्द प्रतिबंधात्मक कारवाई करण्याबाबत आदेशीत केले आहे.

वरिष्ठांचे आदेशानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.श्रीहरी बहिरट यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा,युनिट ३ चे पथक दि.१४/०७/२०२३ रोजी रात्री पर्वती पोलीस स्टेशनचे हद्दीमध्ये कोम्बींग ऑपरेशन करित असताना **सहा.पो.फौजदार संतोष क्षिरसागर** व **पो.शि ८७६१ ज्ञानेश्वर चित्ते** यांना मिळालेल्या बातमीवरुन रेकॉर्डवरील गुन्हेगार नामे संतोष विनायक नातू वय ४७ वर्ष,रा.मु.पो.पिंपळगांव,ता.दौड जि.पुणे हा झोन क्र.३,४,५ पुणे महानगरपालिका उदयान कार्यालय समोर,सार्वजनिक रोड,निलायम ब्रिज,पुणे येथे पिस्टल विक्री करता येणार असल्याची माहिती मिळाल्याने त्यास सदर ठिकाणी सापळा रचुन ताब्यात घेण्यात आले.

त्याचे ताब्यातून देशी बनावटीचे ०२ पिस्टल व ०७ जिवंत काडतुसे असा एकूण ८१,४००/- रुपये किंमतीचा माल हस्तगत करण्यात आला असून त्याचे विरुध्द पो.शि.८७६१ ज्ञानेश्वर चित्ते यांनी दिलेल्या फिर्यादी वरुन पर्वती पोलीस स्टेशन पुणे येथे गुन्हा रजि.नंबर.२००/२०२३ आर्म ॲक्ट कलम ३(२५) व महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७ (१)(३) सह १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नमुद आरोपीत हा रेकॉर्डवरील गुन्हेगार असुन तो सदरची पिस्टल कोणाला विक्री करणार होता. याबाबतचा पुढील तपास गुन्हे शाखा,युनिट ३ कडील पोलीस उपनिरीक्षक अजितकुमार पाटील हे करित आहेत.

सदरची कामगिरी ही, मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर श्री.रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त,पुणे शहर श्री.संदिप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे,श्री.रामनाथ पोकळे, मा.पोलीस उप आयुक्त,गुन्हे, श्री.अमोल झेंडे, मा.सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे १,श्री.सुनिल तांबे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट-३ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्रीहरी बहिरट,पोलीस उप-निरीक्षक अजितकुमार पाटील,पोलीस उप-निरीक्षक राहुल पवार, सहा.पो.फौ.संतोष क्षिरसागर,पोलीस अंमलदार राजेंद्र मारणे,शरद वाकसे,किरण पवार,सुरेंद्र साबळे,संजिव कळंबे,ज्ञानेश्वर चित्ते,सतिश कत्राळे,प्रताप पडवाळ,प्रकाश कट्टे,साईनाथ पाटील, साईकुमार कारके,सोनम नेवसे,भाग्यश्री वाघमारे यांचे पथकाने केली आहे.

